**रे.मु.नं.१५७/२०१४**

## आदेश निशाणी क्र. ५३ वरील

१. प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ अ, क, ड, इ यांनी त्यांना कैफीयत दाखल करणेस, झालेला उशीर माफ करुन मिळणेसाठी केलेला आहे.

२. प्रतिवादी सांगतात, यातील मुळ प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दाव्यात यापुर्वीच कैफीयत दाखल केलेली आहे. प्रस्तुतचा दावा प्रलंबीत असताना यातील प्रतिवादी क्र.३ हे मयत झालेले आहेत. त्यामुळे त्यांचे वारसांना दाव्याचे कामी सामील केले आहे. या प्रतिवादींना प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुत दाव्याचे कामी जी कैफीयत दाखल केलेली आहे तिच स्वीकारणेची आहे. त्याबाबत पुरसीसही दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.३ यांनी यापुर्वी कैफीयत दाखल केली आहे ती अभिलेखावर असताना वेगळी कैफीयत दयायचे कारण नाही, या गैरसमजुतीखाली सदर प्रतिवादी असल्याने त्यांनी मुदतीमध्ये कैफीयत दाखल केलेली नाही. दावा स्थावर मिळकती संदर्भातील आहे त्यामुळे या प्रतिवादींना त्यांची कैफीयत पुरसीसव्दारे स्वीकारुन घेणे गरजेचे आहे म्हणून हा अर्ज.

३. यातील वादींनी त्यांचे म्हणणे देवून प्रतिवादींचे अर्जास हरकत नोंदविली आहे व अर्जातील कथने योग्य व खरी नसल्याचे ते सांगतात. तसेच ते सांगतात केवळ काम लांबविण्याच्या उददेशाने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. यदाकदाचित अर्ज मंजूर करणेस झाल्यास खर्च लादणेबददल वादी कळवितात.

४. प्रतिवादी व वादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा हा वाटप, पृथक कब्जासाठीचा आहे. प्रकरणाचे अवलोकन करता या प्रतिवादींना ता.२०.३.२०१७ रोजी समन्स लागल्याचे दिसते. सदर तारीख पाहता या प्रतिवादींनी ता.२०.६.२०१७ रोजी अगर त्यापुर्वी कैफीयत देणे अपेक्षीत होते.

सदर तारखांचा तपशील पाहता, या प्रतिवादींना कैफीयत दाखल करणे सुमारे एक महिन्याचा उशीर झाल्याचे दिसते. झालेला उशीर पाहता तो खर्चाच्या रकमेवर माफ होण्यासारखा आहे. प्रतिवादींनी या अर्जासोबत प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी आधी दिलेली कैफीयत ते स्वीकारत असल्याबददल पुरसीस दिलेली आहे त्यामुळे या प्रतिवादींना वेगळी अशी कैफीयत देणेची नाही.

६. कैफीयत स्वीकारत असल्याबाबतची पुरसीस दाखल न करुन घेतलेस या प्रतिवादींना संधी नाकारल्यासारखे होईल. सबब झालेला उशीर माफ करुन वादी दाखल करत असलेली पुरसीस अभिलेखावर येणे गरजेचे वाटते. सबब प्रतिवादींचा अर्ज नि.५३ हा रु.१००/– च्या खर्चावर मंजूर केला. खर्चाची रक्कम वादींना देण्यात यावी.

. (कु.एल.एच.जाधव )

दिनांक : १७/०८/२०१७. २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मोहोळ.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Order /Judgment are same word to word, as per the original Order /Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | H.J.Mane |
| Court | : | $2^{nd}$ Jt. Civil Judge Jr. Division Mohol. |
| Date | : | 17/08/2017 |
| Judgment /order signed by the Presiding Officer on | : | 17/08/2017 |
| Judgment/order uploaded on | : | 19/08/2017 |